सन २०१६-१७ करीता तालीम, कुस्ती केंद्राचा विकास करण्यासाठी आर्थिक सहाय्य वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक : क्रीडायो-२३१६/प्र.क्र.१५३/क्रीयुसे-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ०३२ ४००
तारीख : ३१ ऑक्टोबर, २०१७.

वाचा -:

१) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे-१ दि.१ मार्च,२०१४.
२) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.क्रीडायो-२३१६/प्र.क्र.१५३/क्रीयुसे-१ दि. ०३ मार्च, २०१७.
३) शासन शुध्दीपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडायो-२३१६/प्र.क्र.१५३/क्रीयुसे-१,दि. २१ मार्च,२०१७.
४) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र. ताकुकेंवि/अनुदान/शिफारस/२०१७-१८/का.६/४२६७, दि. २४ ऑगस्ट, २०१७.

शासन शुध्दीपत्रक-:

संदर्भाधीन दि.३ मार्च,२०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ मध्ये शेवटी "संबधित संस्थेस एकुण मंजूर करण्यात येणा-या अनुदानाच्या १०% रक्कमेची बँक गॅरंटी घेणे आवश्यक राहील. त्यानुसार बँक गॅरंटी व प्रतिज्ञापत्र संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात आल्यानंतर मंजूर रक्कमेच्या केवळ ७५ % निधी संस्थेस आर.टी.जी.एस. व्दारे वितरीत करण्यात यावा" या ऐवजी "संबधित संस्थेने प्रतिज्ञापत्र संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात आल्यानंतर अंदाजित खर्चाच्या ७५ % किंवा कमाल रू.७.०० लक्ष यापैकी जे कमी असेल इतके अर्थ सहाय्य ७५:२५ (शासन व संस्था) या प्रमाणात अनुदान स्वरूपात एक रकमी देण्यात येईल" असे वाचावे.

क्र.२.१ मध्ये "संबंधित संस्थेने स्वहिस्सा २५ % रक्कम प्रथम खर्च केल्यानंतर सदर निधी वितरीत करण्यात यावा" या ऐवजी "संबधित संस्थेने स्वहिस्सा म्हणून अंदाजपत्रकीय रक्कम/एकुण खर्चाच्या २५ % रक्कम प्रथम स्वत: खर्च करणे आवश्यक राहील" असे वाचावे.

क्र.२.२ अन्वये "संबंधित संस्थेकडून स्वहिस्सा २५ % व देय अनुदानापैकी वितरीत कलेले ७५ % अनुदान खर्च करून सदर बांधकामांच्या सद्यस्थितीतील फोटोसह सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे खर्चाचे विवरणपत्र सादर केल्यानंतरच क्षेत्रीय कार्यालय/ संचालनालयाकडून संबंधित संस्थेस उर्वरित देय असलेली २५ % रक्कम पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीच्या अधीन राहून देय होईल" या ऐवजी "संबंधित संस्थेने मंजूर अनुदान बाबीवर संस्था स्वहिस्सा २५ % रक्कम प्रथम खर्च केलेला अभियंत्याच्या स्वाक्षरीचा प्रगती अहवाल, सदर बांधकामांच्या सद्यस्थितीतील फोटोसह सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे खर्चाचे विवरणपत्र सादर केल्यानंतरच संचालनालयाकडून संबंधित संस्थेस मंजूर अनुदान रक्कम एक रकमी स्वरूपात देण्यात येईल" असे वाचावे.

तसेच बाब क्र.२.३ अन्वये "अनुक्रमांक क्र.२.२ मध्ये नमूद केल्यानुसार विवरणपत्र संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे दाखल केल्यानंतर संबंधित संस्थेची बॅक गॅरंटी मुक्त करण्यात यावी" या ऐवजी "दिलेल्या मुदतीत काम पुर्ण करून काम पुर्णत्वाचा दाखला अभियंत्याच्या स्वाक्षरीचा, काम पुर्ण झाल्याचे विविध बाजूकडील रंगीत फोटोसह सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र व लेखा विवरणपत्र संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी/संचालनालयास सादर करणे बंधनकारक आहे" असे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११०११६२८४१३८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.11.01 16:15:04 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव.
२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे.
४) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल लेखा व परिक्षा, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे.)
७) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे)
८) वित्त विभाग (व्यय-५),मंत्रालय,मुंबई.
९) नियोजन विभाग,का-१४७१,मंत्रालय,मुंबई.
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी,पुणे.
११) निवड नस्ती, क्रीयुसे-१.